# <u>महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम – २०१५</u>

महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना शासनामार्फत व शासनाचे अधिनस्त सर्व सार्वजनिक प्राधिकरणांमार्फत दिल्या जाणाऱ्या अधिसूचित सेवा पारदर्शक, गतिमान व विहित कालमर्यादेत देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ पारित करण्यात आला असून तो दि. २८.०४.२०१५ पासून अंमलात आहे. नागरिकांना सुलभ व कालमर्यादेत सेवा मिळाव्यात हे त्याचे उद्दिष्ट आहे.

वरीलप्रमाणे अधिसूचित सेवा नागरिकांना दिल्या जात आहेत किंवा नाही यावर देखरेख, समन्वय, सनियंत्रण ठेवण्यासाठी व या संदर्भात सुधारणा सुचविण्यासाठी उपरोक्त कायद्यान्वये महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग गठीत करण्यात आला असून आयोगामध्ये एक मुख्य आयुक्त व सहा आयुक्त कार्यरत आहेत. आयोगाचे मुख्यालय नविन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई येथे असून सहा विभागातील मुख्यालयाच्या ठिकाणी आयुक्तांची कार्यालये आहेत.

पात्र नागरीकांना विहित वेळेत सेवा न मिळाल्यास अथवा नियमोचित कारणाशिवाय तो नाकारल्यास अशा निर्णयाविरुद्ध संबंधितांना वरीष्ठांकडे प्रथम व द्वितीय अपिल करता येते व तरीही समाधान न झाल्यास आयोगाकडे तृतीय अपिल करता येते. कसूरदार अधिकाऱ्यास प्रतिप्रकरण रु. ५०००/- पर्यंत दंड होऊ शकतो. या विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या अधिसुचित सेवांची यादी सोबतच्या प्रपत्रात दिली आहे.

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाची वेबसाईट खालीलप्रमाणे आहे;

https://aaplesarkar.mahaonline.gov.in

# प्रपत्र

## नियोजन विभाग, रोजगार हमी योजना प्रभागामार्फत अधिसुचित सेवांची यादी

| अ. क्र. | लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरविण्यासाठी विहीत केलेली कालमर्यादा | अर्जाचा विहीत नमुना | पदनिर्देशित अधिकारी (पदनाम) | प्रथम अपील प्राधिकारी (पदनाम) | द्वितीय अपील प्राधिकारी (पदनाम) |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | मजुराची नोंदणी करून जॉब कार्ड देणे | अर्ज प्राप्त झाल्यापासून १५ दिवसात जॉब कार्ड देणे | नमुना क्र. १ | ग्राम सेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| २ | मजुरांना काम देणे | कामाची मागणी केल्यानंतर १५ दिवसात काम उपलब्ध करून देणे | नमुना क्र. ४ | ग्राम सेवक (ग्रामपंचायतीचे काम)<br><br>संबंधित यंत्रणेचे स्थानिक व तालुकास्तरीय अधिकारी (यंत्रणेमार्फतचे काम) | सहायक गट विकास अधिकारी<br><br>नायब तहसिलदार | गट विकास अधिकारी<br><br>तहसिलदार |

तृतीय व अंतिम अपिल राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर यांचेकडे करता येईल.